Reg. No. MAH/SOL/0000045/2018

# काव्यप्रेमी...

दिवाळी अंक २०१८



...cipal
Jawahar Arts, S... Commerce Col...
Andur T... Osmanabad

# काव्यप्रेमी...

दिवाळी अंक २०१८
वर्ष : पहिले

◆ संपादक : आनंद घोडके ◆
◆ कार्यकारी संपादक : कालिदास चवडेकर ◆

◆ प्रकाशक :
काव्यप्रेमी शिक्षक मंच

◆ मुखपृष्ठ
श्याम स्वामी

◆ अक्षरजुळणी :
प्रदीप कोडगीमठ

◆ मुद्रक
सचिन ऑफसेट, सोलापूर

◆ प्रकाशन
दिनांक ८ नोव्हेंबर २०१८
कार्तिक शु. १ शके १९४०

◆ स्वागत मूल्य
१५१/-

## अंतरंग

### कथा

सुवासिनी– नवनाथ खरात ...३
स्तब्धता– भगवान विशे ...४
क्षितिज– सौ.अंजली देशमुख ...५
वडावरचं भूत– वासुदेव पाटील ...६
हो ...देव आहे– भाऊसाहेब सोनवणे ...७
योगायोग – सौ. आशा पाटील ...८
पणती जपून ठेवा – सौ.जया नेरे ...११
काळा डोळा– कृष्णा शिंदे ...१२
चांदीचे कडे– रामहरी पंडीत ...१४
पक्षांना चारा– श्रीम.सुप्रिया दापके ...१५
गजरा– सुरेश तायडे ...१६

### लेख

सार्वजनिक गणेशोत्सव– राजेश साबळे ...१७
स्त्री शक्तीचा महिमा – सौ. ज्योती वायमारे ...१८
दिवाळी आमची आणि त्यांची – हणमंत पडवळ ...१९
परीस स्पर्श – कचरू चांभारे ...२०
माझी उपक्रमशीलता – शाम स्वामी ...२१
अनाठायी खर्च टाळू या – नागोराव येवतीकर ...२२
साहित्य भान – संदीप वायोले ...२३
आत्महत्या – प्रदीप पाटील ...२४
विद्यार्थी विकास... – श्रीम.शोभा दळवी ...२५
चाबुक – दीपक सपकाळ ...२६
स्त्री स्वसंरक्षण..– श्रीम. स्मिता मुराळी ...२७
मला भेटलेली सुंदर स्त्री – श्रीम. सोजर मस्के ...२८
कविता म्हणजे...– आनंद घोडके ...२९
सादरीकरण एक : कला– कालिदास चवडेकर ...३०
कला विषय – महादेव खळूरे ...३१
संस्कृत साहित्यातील..– प्रा.सत्येंद्र राऊत ... ३२
जाळे नात्यांचे – सौ.प्रिया सुरवसे ...३४
तोच चंद्रमा नभात – सौ.ज्योत्स्ना घोडके ...३५

### काव्यफुलोरा

...३७ ते ...५२

वनश्री पाटील * विजया पाटील * प्रा.भोजराज लांजेवार * वंदना सलवदे * सरला साळुंखे * नवनाथ गाडेकर * बाळासाहेब तोरस्कर * गुरूदत्त वाकदेकर * संगीता वाढोणकर * कमलेश गोसावी * व्यंकटेश काटकर * राजेश हजारे * प्रमोद बाविस्कर * जस्मिन शेख * साईली राणे * विजयकुमार धोत्रे * प्रदीप पवार * रामदास देशमुख * युवराज जगताप * शितल गाजरे * आरती बाविस्कर * शारदा मालपाणी * साधनाताई चौधरी * राष्ट्रपाल सावंत * प्रमोद घाटोळ * सारिका पाटील * संजय गावंडे * यमुना माळी * रविंद्रकुमार तनपुरे * अर्चना मोहोनकर * अंकुश शिंगाडे * अंजना भंडारी * जयवंत वानखडे * सु.पुं.अढाऊकर * प्रा.संतोष बोंगाळे * द.ल.वारे * खाजाभाई बागवान * सपना बांगर * पांडुरंग गिरी * पी.नंदकिशोर * स्वप्निल जगताप * संजय घोगरे * मनिषा रायजादे * मुकेश विशे * प्रमिलाताई सोनकुडे * प्रीती गोगटे * उज्वला इंगळे * सुवर्णा जाधव * अश्विनी धाट * पांचाळ आर.सी. * वर्षा भोज * ललित बोरसे * वर्षा भांदर्गे * सीमा भांदर्गे * खुशाल गुल्हाणे * माधुरी फालक * सुचिता कुलकर्णी * पल्लवी पाटील * कैलास गवळी * डॉ.शीतल मालुसरे * विजय बिंदोड * डॉ.के.डी.संखे * विजय फडणीस * रंजना लसणे * मनाली माळी * दिपमाला खडके * वीणा जोशी * हेमा विदवत * डॉ.राजदत्त रासोलगीकर * अनंत बावने * प्रिया मयेकर * गणेश खडके * लक्ष्मीपुत्र उप्पीन * लक्ष्मण सावंत * डॉ. अलका नाईक * पांडुरंग टेळे * प्रा.दत्तात्रय धिवरे * अनिल चांदेकर * संध्या पालव

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. T...
...manabad

या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील लेखकांच्या विचारांशी अथवा मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# 'संस्कृत साहित्यातील नीतिकथांचे महत्त्व'

प्रा. सत्येंद्र संगप्पा राऊत
उस्मानाबाद, मो. ७३८७३९४७४७

संस्कृत भाषा ही अत्यंत प्राचीन भाषा आहे. संस्कृत भाषेत वेद, उपनिषदे, आरण्यके, रामायण, महाभारत, पंचतन्त्र व हितोपदेश असे अनेक ग्रंथ आढळतात. या सर्व ग्रंथातून आपणास संगीत, कला, स्थापत्य, तंत्रज्ञान, आयुर्वेद व नीति विषयक ज्ञान मिळते.

संस्कृत साहित्य हे विविध ज्ञान शाखांचे समृध्द भांडार आहे. संस्कृत साहित्याची स्वतःची अशी एक वेगळी शैली आहे जी आधुनिक काळातही विविध ज्ञान प्राप्तीसाठी मुलभूत नैतिक, आध्यात्मिक यांचे ज्ञान आवश्यक करुन देत असते.

भारतीय कथा साहित्याची जी वर्गवारी केली जाते तिच्यात नीति कथा हा एक प्रमुख वर्ग आहे. नीति कथेचा उद्‌गम वैदिक वाङ्मयातून झाला आहे. यातील विविध कथेत प्राणी कथेचा प्रवेश महाभारताच्या नीति कथेद्वारे झाला. नीतिकथात पशुपक्षी वगैरे प्राणी येत असले तरी प्राणीकथा या नीतिकथाहून भिन्न आहेत. प्राणीकथांचे जग प्राण्यांपुरतेच मर्यादित नसते तर ही कथा एखादे नीतितत्व मनाशी धरुनच रचलेली असते. कथेच्या शेवटी ते नीतितत्व प्रच्छन्न किंवा प्रकट अशा तात्पर्यांच्या रुपाने व्यक्त होत असते. कधी कथेच्या शेवटी तात्पर्य दर्शक सुभाषित दिलेले असते तर कधी प्रथम एखादा दृष्टान्त श्लोक सांगून मग त्याच्या स्पष्टीकरणासाठी कथा सांगितलेली असते.

पंचतन्त्र, हितोपदेश, सिंहासन बत्तिशी हे कथा संग्रह ही नीतिकथा सांगण्यासाठी प्रवृत्त झाले आहेत. नीतिकथेत उपदेशाप्रद विषयांची प्रधानता आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या मानवाच्या उपदेशात्मक प्रवृत्तीचे यात स्थान आहे.

वर्तमान युग हे वैज्ञानिक युग आहे. या वैज्ञानिक युगामध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत प्रमाणाबाहेर वाढला आहे. त्याचा परिणाम जनमानसावर समाजावर किंवा आपल्या देशातील तरुण पिढीसारख्या महत्त्वाच्या घटकावर होत आहे. सद्यःस्थितीत तरुणवर्ग असो वा अन्य कोणीही तो आपल्या देश, धर्म, संस्कार, सांस्कृतिक व नैतिक जबाबदारीपासून दूर होत चालला आहे. मानव जसे शरीराला निरोगी ठेवून उत्तम आरोग्याची दक्षता बाळगतो तसेच समाजाला सुंदर बनविण्यासाठी नैतिकता देखील ठेवणे हे मानवाचे कर्तव्य आहे. मानव भौतिकदृष्ट्या किंवा बाह्य स्वरुपात जितका सुखी व संपन्न होत आहे याहून अधिक आंतरिक दृष्ट्या दुःखी होत चाललेला आहे. आज मानसिक रोग, हिंसाचार, संघर्ष, द्वेष व विविध शारीरिक आजार यांचेप्रमाण वेगाने वाढत आहे. तो भौतिकवादी विचारसरणीचा व संस्कारहीन किंवा नीतिमूल्याचा ऱ्हास झाल्याचाच दुष्परिणाम आहे. तेव्हा सामाजिक व मानसिक विकारांच्या निवारणार्थ मानवी सदाचार, सद्‌गुण, उत्तम संस्काराद्वारे व नीति विषयक कथाद्वारे मानवाचे रक्षण करण्याची आज आवश्यकता आहे.

धर्म, अर्थ व काम संबंधीत विषयासह सदाचार, राजनीतिक तसेच व्यावहारिक ज्ञानाला संस्कृतातील, नीतिकथेच्या माध्यमाने अत्यंत प्रभावित केले आहे. यातील पात्रे प्रायः पशुपक्षीच असतात. परंतू त्यांच्याकडून निर्माण होणारे ज्ञान नैतिक आणि व्यावहारिक ज्ञान मानव मात्रासाठी उपयोगी ठरते. म्हणून पंचतंत्राच्या अत्यंत सोप्या, मनोरंजक आणि चांगल्या उपदेशात्मक कथांचा आधार घेऊन त्यात असलेल्या नीतिकथांचा अभ्यास करुन कोणतीही व्यक्ती आपले वैयक्तिक, पारिवारिक, आर्थिक आणि सामाजिक जीवनाच्या समस्यांना चांगल्याप्रकारे तोंड देऊ शकतो. यातील विविध ठिकाणीच्या अनेक महत्त्वपूर्ण युक्तींच्या संग्रहामुळे तो योग्य वेळी त्यातून फायदा घेऊ शकतो. अशाप्रकारे संस्कृतातील नीतिकथा प्रकाशमान (तेजस्वी) असलेल्या मण्याप्रमाणे सर्वांना मार्गदर्शन करण्यास नेहमी समर्थ आहे.

संस्कृत साहित्याचे आणि मानवाचे खूप मोठे नाते आहे. संस्कृतातील नीतिकथांचे मानवी जीवनातील अनन्य साधारण महत्त्व आपल्या लक्षात येते. मानवी कल्याणाचा विचार पूर्वीच केलेला आहे. नीतिकथा शिक्षित व सुसंस्कृत लोकांच्या कल्पनेतूनच निर्माण झालेल्या आहे. म्हणून मानवाने जर संस्कृत साहित्याने सांगितलेली नीतितत्वे बाळगली तरच तो सुखी संपन्न बनू शकतो.

नीतिकथा सत्य, अहिंसा, दया, दान, कृतज्ञता, परोपकार, सदाचरण इत्यादी मानवी सद्‌गुणांची शिकवण देते. माणसाला लौकिक व्यवहारात चतुर बनविने, दुष्ट व धूर्त लोकांचे अंतरंग समजण्या इतकी त्याची बुध्दी तीक्ष्ण करणे आणि पर्यायाने त्याचे धर्मार्थकामसिध्द व्हायला मदत करते तसेच -

सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ।।

Principal
...har Arts, Science & Commerce College,
...r Tal. Tuljapur Dist. Osmanabad

आज शिक्षणाच्या विविध क्षेत्रात नैतिक शिक्षणात समावेश झालेला आहे. काळाची गरज पाहता हे आवश्यक आहे. कारण नव्या पिढीच्या नवयुवकांनी नीतिमूल्याकडे लक्ष देणे खूपच आवश्यक वाटते.

समाजातील प्रत्येक मानव हा समाजाचा व देशाचा संरक्षक आहे. अनैतिक आचार-विचाररुपी प्रदूषण आज जगासमोर एक मोठी समस्या निर्माण झालेली आहे. समाजातील जनमानसांना नीतिहीन व दिशाहीन करणारी तत्वे खूप आहेत. मनुष्याने नीतिमूल्याद्वारे स्वतःचे परिवराचे व समाजाचे संरक्षण करणे हे त्याचे कर्तव्य आहे. आजचा समाज साक्षर झालेला आहे. परंतु भौतिक व दूषित विचारांनी बरबटलेला आहे. बिघडलेल्या वातावरणाची समस्या कोणत्या विशिष्ट देश, धर्म, जात व व्यक्तीची नसून जनसामान्याची समस्या बनली आहे. ज्ञानाच्या प्रगतीबरोबर माणसाची विलासीनता वाढलेली आहे. परिणाम स्वरुप विज्ञान द्वारा निर्मित अनेक सुखाचे साधन धोकादायक झालेली आहेत.

लोभ, मोह, द्वेष व विविध व्यसनांनी समाजाला मानसिक दृष्ट्या कमजोर बनवून टाकले आहे. मनुष्य, सत्य, अहिंसा, संकल्प, जपज्ञान व त्यागाच्या विशिष्ट गुणाद्वारे समाजातील नीतिहीन प्रदूषण दूर करु शकतो.

मानवी नीतिमूल्यांचा उद्‌घोष सर्वप्रथम वेदांनी व संस्कृत साहित्यांनीच केला. मानव जातीची संपूर्ण जगताच्या कल्याणाची विचारधारा वेद व संस्कृत साहित्यातच प्रकट झाली. एवढेच नाहीतर मानव जीवनात सुसूत्रता येण्यासाठी संस्कृत साहित्यांनी मानवाला वेळोवेळी मार्गदर्शन केले. मानवाचा संबंध केवळ मानवाशीच नसून निसर्गाशी ही असतो.

माणूस प्राचीन काळापासून निसर्गाकडून काहींना काही शिकत आला आहे. माणसाची आकलन शक्ती ही नैमित्तिक साधनाद्वारे असते आणि पशुपक्ष्यामध्ये जे ज्ञान आहे ते स्वाभाविकच आहे. सिंहातला शूरपणा, लांडग्याचा क्रूरपणा, कोल्ह्याचा धूर्तपणा, कुत्र्यातला प्रामाणिकपणा, कावळ्यातला चाणाक्षपणा, गाईतला निरागसपणा इ. प्राण्यांचे जे स्वभावविशेष ते संकेताने ठरलेले असतात. नीतिकथांच्या निर्मात्यांनी त्यांचे क्षेत्र मानवा पुरतेच मर्यादित ठेवलेले नाही. अपितु पशु-पक्षी, वृक्ष-वल्ली, नदी-पर्वत, देव-देवता किंबहुना सारे विश्वच त्यात सामावून टाकले आहे. सर्वच नीतिविषयक संस्कृत साहित्यांनी आपापल्या परीने नीतिज्ञानाचा अभ्यास करुन समाजाला चांगली दिशा दिली. म्हणूनच संस्कृत साहित्यात नीतिकथांच्या माध्यमातून नीतिमूल्याचे ज्ञान दिसून येते.

●●●

## (पान ३१ वरून) कला विषय अभ्यासाचे स्वरूप

कलाशिक्षक करत असतात. सर्वांगीण विकास जर घडवायचा असेल तर त्यात कला विषयास अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा विषय विद्यार्थी अत्यंत आवडीने शिकत असतो. त्यातून त्यांना अनेक गोष्टींची कल्पना येते त्यांच्या मनःपटलावर हुबेहूब चित्र प्रकटते यातून तो प्रयत्न करतो व न्यूनगंडापासून वराच जाण्याचा प्रयत्न करतो व सुंदर संभाषण, गाणी, चित्र अभिनय, नृत्य करण्यास शिकतो. मुलांच्या विकासासाठी कलाविषय व कला शिक्षक यांचा अत्यंत महत्वाचा संबंध आहे.

पु.ल. देशपांडे म्हणतात, 'पोटापाण्यासाठी उदीरनिर्वाहासाठी कोणताही व्यवसाय करा. तो तुम्हाला जगवील, पण कोणतीही कला, नृत्य, नाट्य, संगीत, काव्य, शिल्प, चित्र, क्रीडा यातील एकीशी मैत्री करा, ती तुम्हाला कसं जगायचं ते शिकवील.'

जगप्रसिध्द आंग्ल नाटककार शेक्सपिअर देखील जग ही एक रंगभूमी आहे. असेच म्हणतो. या रंगभूमीवरील प्रत्येकाला आपल्या वाट्याला आलेली भूमिका पार पाडावयाची असते. माणूस जीवन जगत असतो.

सारांश प्रत्येक माणसाजवळ कोणती ना कोणती कला असतेच. फरक इतकाच की, आपल्याजवळ असलेल्या कलेची जाणीव प्रत्येकाला असतेच असे नाही.

कस्तुरीमृग जसा कस्तुरी स्वतःजवळ असलेला असतानाही तिचा सुगंध कोठून येतो आहे या संभ्रमात सापडतो आणि स्वतःजवळ असलेल्या सुगंधाचा शोध घेण्यासाठी तो इतस्ततः सैरावैरा भटकत असतो. माणसाचंही तसंच आहे.

संदर्भ :


१. देशपांडे- संशोधन पध्दती, ग्रंथनिर्मिती केंद्र

२. पवार ना. ग.- भारतातील शिक्षण पध्दतीचा विकास, नित्यनूतन प्रकाशन, पुणे- २००७

३. प्रा. पु.ना. वीरकर- भारतीय सौंदर्य शास्त्र- १९८४, साधना प्रेस, शनिवार पेठ, पुणे.

४. विलास कुलकर्णी- कला अध्यापक, अध्ययन, अध्यापन, कलाध्यन, स्मरणिका पुणे, रौप्यमहोत्सवी वर्ष- १९९२-१९९३


●●●

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ

## काव्यमहोत्सव - एक दृष्टिक्षेप...




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad